जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५०९ दिनांक - ०८/०७/२०२३**

**भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे शहर**

# टोळी प्रमुख आदित्य /सोन्या खंडू कांबळे व त्याचे इतर ०३ साथीदार यांचे विरुध्द मकोका अंतर्गत कारवाई.

आदित्य /सोन्या खंडू कांबळे वय २० वर्ष रा घर नं ६ कचरावत चाळ नं आईमंदिराजवळ हनुमाननगर आंबेगाव खुा पुणे (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०३ साथीदार हे फिर्यादी हे काम करीत असलेल्या देशी दारुच्या दुकाना मध्ये येऊन दुकानाचे मॅनेजर यांना शिवीगाळ करून दुकानाचा मालक कोण आहे असे बोलुन दुकान मालकाचे मोबाईल फोन वर फोन लावुन मी आताच जेल मधुन सुटुन आलो असुन तुला कळत नाही काय मला हप्ता चालु कर असे बोलुन शिवीगाळ करुन हप्ता चालु न केल्यास सोडणार नाही असे म्हणुन आरडा ओरड करुन दुकानातील मालाचे नुकसान केले. तसेच दुकाना मधील काउंटरमध्ये असलेले दिवस भराचे रोख १०,०००/- रु. जबरदस्तीने घेऊन दुकानाच्या दिशेने दगड फेकुन आरडा ओरड केला त्याबाबत फिर्यादी यांनी त्यांचे विरूध्द भारती विद्यापीठ येथे फिर्याद दिल्याने भारती विद्यापीठ पोलीस ठाणे येथे गु.र.नं ३२६/२०२३,भा.द.वि.कलम ३८५,३९५,५०४,५०६,४२७ क्रिमीनल लॉ ॲमेंडमेंट ॲक्ट कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याचे तपासा दरम्यान यातील आरोपी नामे **१) आदित्य /सोन्या खंडू कांबळे वय २० वर्ष रा घर नं ६ कचरावत चाळ नं आईमंदिराजवळ हनुमाननगर आंबेगाव खु।। पुणे व त्याचे टोळीचे सदस्य २) सोहेल मोदीन आसंगी उर्फ लादेन वय- २२ वर्षे रा.भोलेवस्ती, इंद्रायणीनगर जांभुळवाडी रोड दत्तनगर कात्रज पुणे ३) अमोल तानाजी ढावरे/डावरे वय १९ वर्ष रा-विश्व हाईट जवळ मोडक वस्ती जांभुळवाडी कात्रज पुणे ४) अजय विजय पांचाळ वय २१ वर्षे रा.नवीन वसाहत,म्हशीचे गोठ्याजवळ, कात्रज, पुणे व जांभुळवाडी शनिनगर पुजा डेअरी जवळ आंगणवाडी समोर कात्रज पुणे. यांना अटक करण्यात आली असून ते सद्या येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे आहेत.** यातील (टोळी प्रमुख) आदित्य /सोन्या खंडू कांबळे याने त्याचे सह अन्य सदस्यांसाठी आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नविन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःची संघटीत टोळी तयार करुन गंभिर स्वरुपाचे गुन्हे केलेले असुन त्यांनी अवैद्य मार्गाने इतर फायदा मिळविण्याचे उददेशाने दरोडा, खंडणी, खुनाचा प्रयत्न, दंगा,बेकायदेशिर हत्यार जवळ बाळगणे,सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे,दुखापत करणे, जनमानसात दहशत पसरविणे या सारखे गंभिर स्वरुपाचे गुन्हे वारंवार केलेले आहेत. त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करुन सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटितपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे व टोळीचे इतर फायदयाकरीता सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आलेने तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन. १९९९ चे कलम ३(१) (ii),३(२), ३(४) प्रमाणे चा अंर्तभाव करणेकामी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विजय कुंभार यांनी मा.पो.उप-आयुक्त परि-२, पुणे शहर, श्रीमती स्मार्तना पाटील यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री. प्रविणकुमार पाटील यांना सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, पुणे ३२६/२०२३,भा.द.वि. कलम ३८५,३९५,५०४,५०६,४२७, क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७, या गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन. १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२), ३(४) प्रमाणेचा अंर्तभाव करण्याची मा. अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री प्रविण कुमार पाटील यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास स्वारगेट विभागाचे सहा.पोलीस आयुक्त श्री.नारायण शिरगांवकर हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनिय कामगीरी मा.पोलीस आयुक्त पुणे शहर, श्री. रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त पुणे शहर, श्री. संदिप कर्णीक, मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री. प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परि-२, पुणे शहर,श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा. पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे शहर श्री.नारायण शिरगांवकर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विजय कुंभार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन, श्री. विजय पुराणिक, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सहाय्यक पोलीस निरीक्षक ,वैभव गायकवाड, सचिन धामणे, सहाय्यक पोलीस फौजदार चंद्रकांत माने, पोलीस अंमलदार नरेंद्र महांगरे, विशाल वारुळे यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देऊन शरिराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मोक्का अंतर्गत केलेली ही ३४ वी कारवाई आहे.**